DISTRICT INDUSTRIES CENTRE
जिल्हा उद्योग केंद्र
Address:-Hotgi Road,Solapur पत्ता:-होटगी रोड,सोलापूर
Telephone No:- ०२१७-२६०५२३२ दूरध्वनी क्रमांक:-०२१७-२६०५२३२
ईमेल :- didic.solapur@maharashtra.gov.in

---

श्रीमती शमा पवार निवासी उपजिल्हाधिकारी सोलापुर यांच्या अध्यक्षतेखाली "जिल्हा निर्यात प्रचालन समिती" ची बैठक दिनांक ०६/०९/२०२१ रोजी संध्याकाळी ४.०० वा जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजीत करण्यात आली होती सदर बैठकीचे इतिवृत्त.

---

प्रथम महाव्यवस्थापक ,जिल्हा उद्योग केंद्र ,सोलापूर यांनी महाराष्ट्र निर्यात प्रचालन परिषद व जिल्हा निर्यात प्रचालन समिती गठित करण्याबाबत उद्योग ,उर्जा व कामगार विभाग मंत्रालय,मुंबई यांचा शासन निर्णय दिनांक १९ आक्टोबर ,२०२० सर्व समिती सदस्यांना अवगत केला. शासन निर्णयाप्रमाणे जिल्हा निर्यात प्रचालन समितीची कार्य,समिती स्थापनेचा उद्येश या बाबत माहिती दिली. "जिल्हा निर्यात प्रचालन समिती " जिल्हयातील निर्यात वाढीसाठी विविध केंद्र व जिल्हा कार्यालये,औद्योगिक संघटना,निर्यात परिषदा,निर्यात सल्लागार इ. यांच्याशी सातत्याने पाठपुरावा , समन्वय व अडीअडचणी दुर करण्याच्या दृष्टीने कार्य करणार आहे.

आजच्या बैठकीमध्ये उद्योग संचालनालय,मुंबई यांचे पत्र दिनांक ३१/०८/२०२१ प्रमाणे जिल्हा निर्यात कती अराखडा तयार करण्याबाबत सर्वसमावेशक चर्चा करणे व कती अराखडयामध्ये समावेश करावयाचे मुददे निश्चित करणे आहेत असे नमूद केले व बैटकिस सूरुवात करण्यात आली.

- **सोलापूर- निर्याती बाबत थोडक्यात**

१-सोलापूर जिल्हयातून टेक्सटाईल उत्पादने, बल्क ड्रग्ज, इंजिनिअरिंग उत्पादने, शेती उत्पादने जसे- केळी,द्राक्षे,बेदाणे,पपई, कांदा व दाळिंब या बाबी निर्यात होतात.

२-विविध उत्पादनाद्वारे सोलापूर येथून होणारी निर्यात अंदाजे रु १००० कोटी पर्यंत आहे.

३- केद्र शासनाने सोलापूर जिल्हा "District as Export Hub Initiative" म्हणून निवडला आहे व त्यासाठी प्रमुख उत्पादने- सोलापूर टॉवेल (टेक्सटाईल) व कृषी उत्पादने,केळी व दाळिंब निवडण्यात आली आहेत.

४-विदेश व्यापार महानिदेशालयाचे पत्र दिनांक २९ आक्टोबर २०२० प्रमाणे सोलापूर जिल्हयाचा Draft District Export Action Plan केलेला आहे. संपर्क अधिकारी म्हणून DGFT चे श्री प्रविण नलावडे, यांची नेमणूक केली आहे.

- **औद्योगिक संघटना व उपस्थित सदस्यांनी सूचविलेले मुद्दे :-**

१. आज रोजी निर्यातकरीता बाहेरील देशामधुन प्रचंड मागणी आहे परंतु वेळेवर कंटेनर उपलब्ध होत नाहीत तसेच कंटेनेरचे दर चारपट करण्यात आलेले आहेत त्यामुळे निर्यातीवर परीणाम होत असल्याचे श्री. राजु राठी अध्यक्षए चेबंर आर्फ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज यांनी सांगितले.

२. शहरामधील वाहतुक सकाळी ७.०० ते दुपारी २.०० पर्यंत बंद असल्यामुळे कच्चा माल व तयार माल वाहतुकीस अडचण निर्माण होत आहे.

३. टेक्सटाईल उद्योगाकरीता मोठया प्रमाणत पाण्याची आवश्यकता असते परंतु पाण्याचा प्रचंड तुटवडा आहे त्यामुळे टॅंकरव्दारे पाणी घ्यावे लागते. टॅंकरव्दारे घेतलेले पाणी विविध ठीकाणहुन आलेले असते त्यामुळे त्यामध्ये गुणवत्ता राहता नाही व त्याचा परीणाम यार्नच्या कलरींग होतो त्यामुळे पुरेसे व गुणवत्तापुर्ण पाणी मिळणे आवयाक आहे.

४. अक्कलकोट रोड एम.आ.डी.सी. मध्ये अंतर्गत रस्ते अत्यंत खराब आहेत त्यामुळे अंतरराष्ट्रीय खरेदीदार आले असता त्याचा खरेदीवरही परीणाम होतो.

५. CETP अपुरी असुन नविन CETP करीता प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठविण्यात यावा.

६. E-Marketing वाढविण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

७. Yarn पुरवठा गरजेनुसार व वेळेवर परुवठा हरोत नाही त्याकरीता Yarn बॅंक निर्माण करणेबाबत विचार व्हावा.

वरील प्रमाणे चर्चा केल्यानंतर मा. निवासी उपजिल्हाधिकारी सोलापुर यांनी सोलापूर येथून जे औद्योगिक घटक आपला उत्पादित माल निर्यात करतात त्यांना येणा-या अडचणी संकलित कराव्यात व या बाबत पत्रव्यवहार करावा असे सुचित केले.

शेवटी श्री. एन.बी. कोळेकर यांनी सर्व उपस्थीतांचे आभार व्यक्त करुन बैठक संपल्याचे जाहीर केले.

महाव्यवस्थापक
जिल्हा उद्योग केंद्र,सोलापूर

निवासी उपजिल्हाधिकारी
सोलापुर

प्रत माहितीस्तव सादर:-
१-मा.उद्योग सहसंचालक (निर्यात),उद्योग संचालनालय,मुंबई.
२-मा.उद्योग सहसंचालक,पुणे विभाग,पुणे